दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक ७५ वा बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## खटला जलदगती न्यायालयात, विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती

ठाणे – बदलापूरच्या दुर्दैवी घटनेचा गतीने तपास करुन खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल आणि यात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

बदलापूरच्या दुर्दैवी घटनेचा गतीने तपास करुन खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल आणि यात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

काय आहे प्रकरण ?

बदलापूरमधील एका नामांकित शाळेमध्ये १ ऑगस्टला २४ वर्षीय आरोपीची सफाई कर्मचारी नेमणूक झाली. त्याच्यावर लहान मुलींना वॉशरूमला नेण्याची जबाबदारी देण्यात आली होती. अल्पवयीन मुलींसोबत १२ आणि १३ ऑगस्टला घृणास्पद कृत्य घडल्याचं एका मुलीने सांगितलं. गुरूवार १४ ऑगस्ट रोजी पीडित ४ वर्षीय दोन मुलींपैकी एकीने तिच्या आजोबांकडे तिने आपल्या प्रायवेट पार्टजवळ त्रास होत असल्याचं सांगितलं, तेच तिने तिच्या आईकडेही सांगितलं.

घाबरलेल्या पालकांनी दुसऱ्या पीडित मुलीच्या पालकांशी संपर्क साधला. त्यांनीही आपल्या मुलीनेही शाळेत जाण्यास नकार देत असल्याचं सांगितलं. ज्यातून पुढे तिच्यासोबत असंच काहीतरी घडल्याची शंका व्यक्त केली. त्यानंतर त्यांनी एका खासगी डॉक्टरच्या माध्यमातून वैद्यकीय तपासणी केली असता डॉक्टरने दोन्ही मुलींसोबत लैंगिक अत्याचार झाला असल्याचं सांगितलं. पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी गेलेल्या मुलींच्या पालकांना तब्बल १२ तास ताटकळत ठेवण्यात आलं होतं.

यामुळे आज बदलापूरचे नागरिकांमध्ये संतापाची लाट असून त्यांनी आज बदलापूर बंदची हाक दिली. आंदोलक आक्रमक झाले. आंदोलनांनी रेल्वे स्थानकावर येऊन ट्रकवर उतरले. त्यांनी लोकल अडवली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार केला. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. विरोधकांनी मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांचा राजीनामा मागितला आहे. या प्रकरणाची तीव्रता पाहून शिंदे सरकारने एकापाठोपाठ एक तातडीने निर्णय घेऊन याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईसाठी पावले उचलत आहेत.

## बदलापूर अत्याचार प्रकरणात गृहमंत्रालयाची मोठी कारवाई

बदलापूर अत्याचार प्रकरणात राज्यभरात मोठे पडसाद उमटत आहेत. आज (दि.२० ऑगस्ट) सकाळपासून बदलापूर रेल्वे स्थानकावर आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे. या घटनेवरून संतप्त जमावाची दखल घेत गृहमंत्रालयाने मोठ्या कारवाईचे आदेश दिले आहेत. बदलापूरच्या घटनेत प्रारंभीच्या काळात कारवाईत विलंब करणारे बदलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना दिले आहेत. यापूर्वी या प्रकरणात ड्खढ ची स्थापना करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात एक्स पोस्ट करत माहिती दिली आहे.



## आपत्ती व्यवस्थापनासाठी मनपा सज्ज पालिकेत कक्षाची स्थापना

लातूर/प्रतिनिधी :- पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी मनपा सज्ज झाली असून त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आला आहे. संभाव्य आपत्तीच्या वेळी नागरिकांनी या कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर शहराचा भौगोलिक विस्तार मोठ्या प्रमाणात होत आहे. लोकसंख्याही वाढत आहे. त्या अनुषंगाने अचानक येणाऱ्या संकटसमयी तयार असावे,या उद्देशाने आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

पावसाळ्यात एखादी इमारत कोसळणे किंवा अचानक आलेल्या मोठ्या पावसाने गटारी तुंबणे, घरामध्ये पाणी शिरणे अशा दुर्घटना घडू शकतात.अशा प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन कक्ष मदतीसाठी तत्पर असेल.

नागरिकांनी अशा दुर्घटनांच्या प्रसंगी १८००२३३१३८८ व २५५५८५ या टोल फ्री क्रमांकावर दूरध्वनी करावा किंवा मनपाचे क्षेत्रीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. अ क्षेत्रासाठी कलीम शेख (९०११०३२४०४), ब क्षेत्रासाठी विजय राजुरे (९०११०१०७७७), क क्षेत्रासाठी पवन सुरवसे (९५९५२७२६९२) व ड क्षेत्रासाठी पांडुरंग किसवे (९०११०३२३०२) यांच्याशी संपर्क साधून दुर्घटनेची माहिती द्यावी. एखाद्या ठिकाणी आग लागली तर अग्निशमन सेवेसाठी २२२१०१, २२४९४९ व १०१ या क्रमांकावर दूरध्वनी करावा.

नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षास माहिती दिल्यानंतर ती माहिती नोंदवून घेतली जाईल.त्यानंतर संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्या संदर्भात तात्काळ सूचना केल्या जातील.दूरध्वनी, एसएमएस यासारख्या साधनांचा वापर करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतर्क केले जाईल. कर्मचारी घटनास्थळावर लवकरात लवकर पोहोचतील यासाठी आवश्यक ती यंत्रणा वापरली जाईल. आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा,असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त नोडल अधिकारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी - जिल्हाधिकारी वर्षा-ठाकूर

लातूर, दि. २० (जिमाका) : आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने विविध पथके स्थापन करण्यात आली आहे. या पथकांच्या नोडल अधिकाऱ्यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक नोडल अधिकारी यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.




प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, रोहिणी नऱ्हे-विरोळे, मंजुषा लटपटे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी आप्पासाहेब चाटे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांच्यासह विविध पथकांचे नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक शांततेत आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी आतापासूनच सूक्ष्म नियोजन करावे. प्रत्येक नोडल अधिकारी यांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या दिशानिर्देशांचा अभ्यास करून त्यानुसार कार्यवाही करावी. निवडणूक प्रक्रियेमध्ये कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रत्येकाने खबरदारी घ्यावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी प्रत्येक पथकांचे नोडल अधिकारी, सहायक नोडल अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीबाबत सविस्तर माहिती दिली.

## खरोळा येथील श्रीदत्त मंदिरास आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तीर्थक्षेत्र विकासाचा ब दर्जा प्राप्त



लातूर : – असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथील दिडशतकाहून अधिक काळापूर्वीच्या श्री दत्त मंदिरास भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ अंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाचा ब दर्जा २० ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राप्त झाला आहे. दत्त मंदिरास 'ब' दर्जा मिळाल्याने आ. कराड यांचे खरोळा आणि परिसरातील भाजपा पदाधिकाऱ्यांसह भाविक भक्तांनी आभार व्यक्त केले आहेत.

खरोळा येथील श्रीदत्त मंदिर येथे सद्गुरु सदानंद महाराज यांची दिड शतकाहून अधिकपूर्वीची जिवंत समाधी असून या मंदिर परिसरात वर्षभर दत्त जयंती सोहळा, श्रावणमास, जन्मअष्टमी यासह विविध उत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरे केले जातात. प्रत्येक कार्यक्रमास खरोळा आणि परिसरातील हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. अत्यंत जुन्या काळातील श्री दत्त मंदिर असून या मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा, येणाऱ्या भाविक भक्तांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. ना. गिरीषजी महाजन साहेब यांच्यासह सर्व संबंधितांशी वेळोवेळी पाठपुरावा करून राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ अंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा दि. २० ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राप्त झाला आहे.

भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड हे मागील काळात खरोळा दौऱ्यावर आले असता त्यांचा मंदिर समिती पदाधिकाऱ्याच्या वतीने सत्कार करून मंदिराला तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा प्राप्त करून देण्याची विनंती केली होती. तेव्हा आ. कराड यांनी श्री दत्त मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी लवकरात लवकर राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र योजनेतून 'ब' दर्जा मिळून देऊ अशी ग्वाही दिली होती. दिलेल्या शब्दानुसार स्वतः प्रयत्न करून आ. कराड यांनी 'ब' दर्जा प्राप्त करून घेतला. या मंदिराच्या विकास कामासाठी पाच कोटी रुपयांचा निधी लवकरच मंजूर करून घेऊ आणि विकास कामांना गती देऊ असे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी 'ब' दर्जा मिळाल्यानंतर बोलून दाखविले.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेचा 'ब' दर्जा मिळाल्याने खरोळा येथील श्री दत्त मंदिरास मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊन मंदिर परिसरात विविध विकास योजने बरोबरच भाविक भक्तांना सोई सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सदरील तीर्थक्षेत्र योजनेचा ब दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, रेणापूर तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, चेअरमन मोहन राऊतराव, रमाकांत फुलारी, चंद्रकांत आदुडे, शालिक गोडभरले, बालाजी मानमोडे, राजकुमार मानमोडे, शरद राऊतराव, हनुमंत राऊतराव, सतीश राऊतराव, दयानंद जाधव, सचिन आडतराव, प्रल्हाद फुलारी खरोळा येथील श्री दत्त मंदिर समिती यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, आणि भाविक भक्ताच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

### कळव्यात गॅसचा भडका उडाल्यामुळे दोघे गंभीर जखमी; शांतीनगरमधील घटना

ठाणे: कळव्यातील शांतीनगर भागातील एका घरातील सिलेंडर गॅसचा भडका उडाल्यामुळे अशोक कुमार ( ५२) आणि समीर शेख (२०) हे दोघेजण होरपळून गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आली. यातील अशोक याच्यावर मुंबईच्या सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्याची माहिती सूत्रांनी दिली.कळव्यातील शांतीनगर भागातील दुर्गादेवी मंदिराजवळील साईबाबा चाळीच्या जावेद यांच्या मालकीच्या घरामध्ये अशोक कुमार हे वास्तव्याला आहेत. त्यांच्या घरातील एच.पी. कंपनीच्या मिनी गॅस सिलेंडरमधून गॅस लिकेज होऊन भडका उडाल्याची घटना मंगळवारी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

## भोकरंबा येथे पुलासह रस्त्यांचे लोकार्पण

### ४.१० कोटीतून विविध विकास कामे; आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते लोकार्पण व भूमिपूजन



लातूर/प्रतिनिधी रेणापूर तालुक्यातील भोकरंबा येथे पुलासह रस्त्यांचे लोकार्पण लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. गावात ४.९० कोटीतून विविध विकासकामे मार्गी लागत असल्याने नागरिकांनी आ. धिरज देशमुख यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. लातूर ग्रामीण मतदारसंघातील भोकरंबा (ता. रेणापूर) येथे स्थानिक आमदार विकास निधीतून मंजूर श्री दिनकर हाके ते अंगणवाडी क्र.३ पर्यंत सिमेंट रस्ता (५ लक्ष) या कामाचे भूमिपूजन आ. धिरज देशमुख यांच्या हस्ते झाले. तसेच गावांतर्गत व वस्त्यांवरील सिमेंट व पेव्हर ब्लॉक रस्ते, डीपी आदी विविध (८५.२२ लक्ष) कामांचे आणि भोकरंबा ते प्रजिमा ३ वरील रस्त्याच्या सुधारणेसह लहान पुलाचे बांधकाम (४ कोटी) या कामांचे लोकार्पणही त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवाजीराव भिसे, त्र्यंबक नाना भिसे, यशवंतराव पाटील, सर्जेराव मोरे, प्रमोद जाधव, विजय देशमुख, प्रदीप देवशटवार, अनंतराव देशमुख, लालासाहेब चव्हाण, उमाकांत खलंग्रे, चंद्रचूड चव्हाण, दिलीप पाटील, अनुप शेळके, महेंद्र भादेकर, सचिन दाताळ, स्नेहल देशमुख, प्रवीण पाटील, राजकुमार हाके पाटील, प्रभाकर केंद्रे, संग्राम माटेकर, हनुमंत पवार, तानाजी कांबळे, शहाजी हाके, पृथ्वीराज शिरसाठ, रमेश सूर्यवंशी, सतीश पाटील, पूजा झगे, निर्मला गायकवाड, मोहनराव भिसे, संभाजी रेड्डी, रामहरी गोरे, विश्वजीत भिसे, शिवाजी देशमुख आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी 'मविआ'ची कामे जनतेपर्यंत घेवून जावे येणाऱ्या अवघ्या काही महिन्यात आगामी विधानसभा निवडणुका होतील. त्यामुळे काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी वज्रमुठ बांधून कामाला लागावे. काँग्रेस व महाविकास आघाडी सरकारने केलेली कामे जनतेपर्यंत घेऊन जावीत, असे आवाहन आ. धिरज देशमुख यांनी केले. मंत्रालयावर महाविकास आघाडीचा झेंडा फडकल्याशिवाय आपण स्वस्थ बसायचे नाही, असे ते म्हणाले. आ. धिरज देशमुख म्हणाले, येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना चांगले दिवस आणायचे आहेत. शेतीला जीएसटी मुक्त करायची आहे. सोयाबीन व इतर शेतीमालाचे बाजारभाव वाढविण्यासाठी देशाचे आयात निर्यात धोरण बदलणे गरजेचे आहे, यासाठी काँग्रेसचे नेते राहूल गांधीजी लढा देत आहेत. त्यांचे हात आणखी बळकट करणे गरजेचे आहे. त्यासाठी काँग्रेसच्या विचाराला बळ द्या. काँग्रेसच्या पाठीमागे असेच खंबीरपणे उभे रहा.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### खनिजांच्या अर्थकारणाला झळाळी

जगभरातील मातब्बर व्यक्तींचा, देशांचा आणि कंपन्यांचा खनिजाकडे वाढता ओढा पाहता पुढच्या वर्षापर्यंत लिथियमचा शोध आणि संशोधनावरची उलाढाल किमान २०० दशलक्षच्या दुप्पट होऊन सुमारे ४०० दशलक्ष डॉलरवर पोहोचेल, असा अंदाज आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या चांगल्या मैत्रीचा आधारही खनिजच आहे. जगात महत्त्वाचे खनिज साठे विकसित देशांकडे आहेत. त्यांची वाढणारी मागणी पाहता संबंधित देशांत रोजगार वृद्धी, आर्थिक वैविध्यीकरण आणि एकप्रकारे तिजोरी भरण्याची मोठी संधी मिळत आहे; मात्र त्यासाठी खनिजावर शाश्वत, संतुलित आणि योग्य मार्गाने प्रक्रिया करायला हवी.

अमेरिकेत एक्सॉनमोबिलने शंभर दशलक्ष डॉलर खर्च करून गॅल्वेनिक एनर्जी कंपनीकडून ४८५ चौरस किलोमीटर परिसरातील लिथियमचा साठा उपसण्याचा अधिकार मिळवला. युसार ते अरकान्सपर्यंत लिथियम काढण्याचा प्रयत्न करतील. या कंपनीचे ध्येय २०३० पर्यंत १९ लाख वाहनांसाठी पुरेशा प्रमाणात बॅटरीत वापरण्यात येणार्या या धातूचा पुरवठा करण्याचे आहे. याप्रमाणे ऑक्सिडेंटल पेट्रोलियमने वॉरेन बफे यांचा उद्योग समूह बर्कशायर हॅथवेच्या एका कंपनीबरोबर संयुक्त उद्योगाची घोषणा करत कॅलिफोर्नियातच्या १० जिओथर्मल वीज प्रकल्पाच्या खाणीतून टॅरी ग्रेड लिथियमचे उत्पादन करण्याची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलियाच्या रियो टिंटोने २०२२ मध्ये अर्जेंटिनामध्ये ८२५ दशलक्ष डॉलरच्या एका लिथियम प्रकल्पाची खरेदी केली. २१ व्या शतकात खनिज हे महत्त्वपूर्ण आणि आवश्यक सामग्री ठरली आहे. ते ऊर्जेवरील आत्मनिर्भरता आणि तंत्रज्ञानातील प्रगती या दोन्हींला वेग देण्याचे काम करत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत त्याचे महत्त्व पाहता तेलाशी तुलना केल्यास त्याला नवीन इंधन असेही म्हटले जात आहे. भू-राजनैतिक घडामोडींना वळण देण्यासाठी त्याची भूमिका अधोरेखित झाली आहे. 'स्टॅटिस्टिका'च्या मते, २०२३ मध्ये जगभरातील लिथियमचे उत्पादन २३ टक्क्यांनी वाढून १.८० लाख टनांवर पोहोचले आहे. जगभरात विजेवर चालणार्या वाहनांचा (ईव्ही) वापर गेल्या वर्षी वेगाने वाढला आहे. गेल्या वर्षी १४ लाख नव्या ईव्हींची नोंदणी झाली आहे. जगभरातील रस्त्यांवर आता ४० लाख ईव्ही धावत आहेत. वेगाने होणारी वाढ ही २०२३ च्या 'ग्लोबल ईव्ही आऊटलूक'च्या आकलनाप्रमाणे आहे. २०२३ मध्ये ईव्हींची विक्री एक वर्षापूर्वीच्या तुलनेत २३ टक्के वाढली. २०१८ च्या तुलनेत ही वाढ सहापट अधिक आहे. अलीकडच्या काळात ईव्ही गाड्यांचा अंगीकार करण्याचा वेग वाढला आहे. गेल्या वर्षी दर आठवड्याला सुमारे अडीच लाख ईव्हींची नोंदणी झालेली आहे. विशेष म्हणजे २०२३ मध्ये एवढ्या गाड्या वर्षभरातही विकल्या गेल्या नव्हत्या; मात्र आताचा अभूतपूर्वपणे वाढलेला बाजार आव्हानेही घेऊन आला आहे.

ऑस्ट्रेलियाशी भारताचा मुक्त व्यापार करार हा याच दृष्टिकोनातून झाला आहे. लिथियम, निकेल, कोबाल्ट, तांबे, दुर्मीळ मातीच्या खनिजाचा शोध बहुतांश देश घेत आहेत. भारतही 'क्लीन एनर्जी'चे तंत्रज्ञान अंगिकारण्यासाठी एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. जर ईव्ही बॅटरीसाठी लिथियम एक महत्त्वाचे तत्त्व असेल, तर कोबाल्टचा वापर विमानाच्या इंजिनसाठी, गॅस टर्बाइन, हायस्पीड स्टील आणि गंजविरोधी मिश्रधातू तयार करण्यासाठी केला जातो. सेमीकंडक्टर चिप्सवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञान हे या महत्त्वाच्या खनिजावर अधिक अवलंबून आहे. सेमीकंडक्टर चिप्स तयार करण्यात सिलिकॉन मूलभूत भूमिका बजावत असेल, तर त्याचे कपॅसिटर आणि अन्य प्रणाली तयार करण्यासाठी टेंटलम, जर्मेनियम, कोबाल्ट आणि काही दुर्मीळ मृदा तत्त्वाचादेखील उपयोग करावा लागतो. सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरणारे संरक्षण उपकरण तयार करण्यासाठी गंजविरोधी आणि उच्च शक्तीयुक्त महत्त्वाच्या खनिजाची गरज भासते. त्यामुळे सक्षम संरक्षण क्षमतेसाठी सुरक्षित आणि लवचीक पुरवठा साखळी तयार करणे आवश्यक आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या चांगल्या मैत्रीचा आधारदेखील खनिजच आहे. प्रामुख्याने ऑस्ट्रेलियाकडे जगातील सर्वात मोठा लिथियमचा साठा असून, तेथील कोबाल्टचा साठा जगात दुसर्या स्थानावर आहे. भारत ऑस्ट्रेलियाच्या महाकाय लिथियम अणि कोबाल्टच्या साठ्याचा वापर करू इच्छित आहे, तर ऑस्ट्रेलियाचे सरकारही आपल्या या मित्रासाठी महत्त्वाचे खनिज देण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करण्यासाठी तयार आहे.भारत आणि ऑस्ट्रेलिया संबंधाचा विचार केला तर उभय देशांनी हंगामी मुक्त व्यापार करार करण्याव्यतिरिक्त 'ऑस्ट्रेलिया-इंडिया क्रिटिकल मिनरल्स रिसर्च हब' स्थापन करण्याचा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे. आयआयटी हैदराबाद आणि मोनाश युनिव्हर्सिटीच्या पुढाकारातून साकरण्यात येणार्या या हबचे ध्येय महत्त्वपूर्ण खनिजाचे उत्खनन, प्रक्रिया संशोधन, विकासाला चालना, शाश्वत पर्याय आणि पुरवठा साखळीच्या विश्लेषणावर लक्ष केंद्रित करण्याचे आहे. आजघडीला अत्यावश्यक खनिजाच्या पुरवठा साखळीवर चीनचा दबदबा आहे. एका अहवालानुसार जगातील एकूण दुर्मीळ मातींच्या (मृदा) तत्त्वांपैकी ६० टक्के उत्खनन चीनच्या हातात आहे आणि त्यावरील प्रक्रिया आणि संशोधन करणारा ९० टक्के बाजार चीनकडून नियंत्रित केला जातो.

# मागच्या दाराने भरती

केंद्र सरकार आता आणखी एका नव्या वादाच्या भोवर्यात सापडले आहे. यावेळचा हा वाद केंद्र सरकारच्या प्रशासकीय सेवेत मागच्या दाराने केल्या जाणार्या भरतीचा आहे. अलीकडेच सरकारने प्रशासकीय सेवेतील ४५ अधिकार्यांच्या भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. अतिरिक्त सचिव किंवा संचालक पदाच्या दर्जाच्या अधिकार्यांच्या भरतीसाठी ही जाहिरात आहे. ही करार पद्धतीने केली जाणारी भरती असणार आहे. एरवी या पदावरील नियुक्त्या यूपीएससीतर्फे केल्या जातात. पण यूपीएससीला टाळून सरकार परस्पर या महत्त्वाच्या पदावरील नियुक्त्या करीत असल्याने देशातले सर्वच विरोधी पक्षांचे नेते एकदम संतापले आहेत. त्यांचा मुख्य आक्षेप असा आहे की, उच्चपदांवरील आरक्षण टाळण्यासाठी सरकारने हा कट रचला आहे.




त्यातून मागास, अन्य मागास आणि अल्पसंख्याकांच्या हक्काचे आरक्षण डावलले जाते आणि केवळ त्यासाठीच सरकारचा हा खटाटोप सुरू आहे, असे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, प्रशासकीय सेवेतील भरतीसाठी यूपीएससीची प्रक्रिया टाळून थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांना प्रशासनात घुसवण्यासाठीचा हा खटाटोप आहे. अखिलेश यादव, बहुजन समाज पक्षाच्या नेत्या मायावती अशा नेत्यांनीही या विरोधात टीकेची झोड उठवली असून अखिलेश यादव यांनी या निर्णयाच्या विरोधात २ ऑक्टोबरपासून आंदोलनाचीही हाक दिली आहे. मायावतींचे म्हणणे असे आहे की, दलित आणि मागासांना पदोन्नतीने जी पदे मिळणे अपेक्षित असते ती पदे आता मागच्या दाराने कराराने भरली जाणार आहेत म्हणजे मागासांचे हक्क डावलण्याचाच हा प्रकार आहे.

या प्रकरणाला सरकारचीही काही बाजू आहे, त्यात त्यांनी म्हटले आहे की अशा पद्धतीच्या लॅटर एन्ट्रीने भरतीची प्रक्रिया करण्याची गरज, यूपीए सरकारच्या काळात नेमण्यात आलेल्या वीरप्पा मोईली यांच्या प्रशासकीय कामकाज सुधारणा समितीने व्यक्त केली होती व तशी शिफारस त्यांनी त्यावेळी केंद्र सरकारला केली होती. त्यानुसारच ही भरती केली जात आहे असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. म्हणजेच यूपीए काळातच ही पद्धत सुरू करण्यात आली आहे असे सरकारचे सांगणे आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, ही शिफारस वीरप्पा मोईली समितीने केली असेलही; पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे मात्र यूपीए सरकारने टाळले होते. या निर्णयाची अंमलबजावणी करून मागच्या दाराने भरती करण्याचे काम प्रत्यक्ष मोदी सरकारच्याच काळात सुरू झाले आहे हे नाकारता येत नाही. मुळात वीरप्पा मोईली समितीच्या शिफारशीचा मुद्दा प्रामुख्याने तज्ज्ञांच्या प्रशासकीय सेवेतील भरतीसाठी मर्यादित होता.

या समितीच्या अहवालाचा सारांश असा की यूपीएसएसी परीक्षेद्वारे जे लोक आयएएस, आयपीएस किंवा अन्य प्रशासकीय सेवांमध्ये भरती होतात, त्यांच्यातून काही विशिष्ट कामांसाठी जी तज्ज्ञांची गरज लागते त्याची कमतरता जाणवते. सरकारकडून अनेक क्षेत्रात कामे सुरू असतात. त्यात विज्ञान तंत्रज्ञान किंवा दूरसंचार अशा तांत्रिक सेवांसाठीच्याही कामाचा समावेश असतो. त्या संबंधातील निर्णय घेताना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत केंद्र सरकारला हवी असते. ती गरज अशा काही मोजक्या क्षेत्रातील जागांमध्ये थेट भरती करून भागवता येते. मोईली समितीला हेच अपेक्षित असावे. आता केंद्र सरकारने जी ४५ अधिकार्यांची भरती करण्याचे योजले आहे त्यात केवळ हाच हेतू आहे काय हे नीट उमगलेले नाही. आधीच या सरकारच्या विरोधात ते आरक्षण विरोधी असल्याचा आरोप सातत्याने होतो आहे. अशा पद्धतीच्या मागील दाराने केल्या जाणार्या भरतीने हा आरोप अधोरेखित होतो आहे.

काहींच्या म्हणण्यानुसार, सरकारने हा केवळ एक खडा टाकण्यासाठी केलेला प्रयत्न आहे. तो चालून गेला, तर पुढील काळात बाकीच्या प्रशासकीय पदांवरही आपल्याच विचारांचे लोक सर्रास स्वरूपात भरती करण्याचा सरकारचा डाव असावा, असाही आक्षेप घेतला जाऊ लागला आहे. प्रशासकीय पदांवर आपल्याच विचारांचे लोक गैरमार्गाने भरती केले तर त्याचा थेट परिणाम लोकांवरही कसा होऊ शकतो याचे उदाहरण देण्यासाठी राहुल गांधी यांनी 'सेबी'च्या अध्यक्षा माधबी बुच यांचे उदाहरण दिले आहे. माधबी बुच या अदानी समूहाच्याच भागीदार असल्याची बाब हिंडेनबर्गच्या अहवालातून समोर आली आहे आणि त्यांनी अदानी समूहाच्या गैरव्यवहारांच्या चौकशीत कसा कोलदांडा घालण्याचा प्रयत्न केला तेही प्रकाशात येऊ लागले आहे. केंद्र सरकारच्या प्रशासकीय अधिकार्यांच्या हातात अनेक अधिकार असतात. ज्यांचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होऊ शकतो.

चौकशी टाळणे, अन्यायकारक प्रकरणे दडपून टाकणे, भ्रष्टाचारावर पांघरुण घालणे अशी कामे या अधिकार्यांना हाताशी धरून करून घेणे सरकारला अवघड नसते. त्यामुळे सरकारची ही मागच्या दाराने होणारी अधिकारी भरती अनेक अर्थाने नुकसानदायक आहे ही बाब बर्याच अंशी खरी आहे. सरकार यातून लगेच माघार घेईल असे संभवत नाही, पण निदान यातील वाद टाळण्याच्या तरी उपाययोजना सरकारला निश्चित करता येतील. त्यातही मागासांवर अन्याय होणार नाही हेही सरकारला पाहावे लागणार आहे. या वादाचा दुसरा एक पैलू असा की अशा मागच्या दाराने भरती होणार्या अधिकार्यांमुळे जे आयएएस सेवेची परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासकीय सेवेत दाखल झाले आहेत तेही दुखावले जाणार आहेत.

या अधिकार्यांच्या लॉबीला दुखावणे देशाच्या हिताचे नाही. या वादाला अनेक पैलू असल्याने आणि त्याचा थेट संबंध सरकारच्या हेतूशी असल्याने सरकारला सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. सरकारने या आधीच 'अग्निवीर योजने'द्वारे चार वर्षांच्या कंत्राटी पद्धतीची लष्कर भरती सुरू केली आहे. ती योजना संपूर्ण देशात वादग्रस्त ठरली आहे. पण सरकारने त्याचा पुनर्विचार अजून सुरू केलेला नाही. उलट सरकारने त्याचे जोरदार समर्थनच चालवलेले दिसले आहे. आता अशी कंत्राटी स्वरूपाची प्रशासकीय भरती सुरू करून सरकार नेमके काय साधणार आहे, हे कळेनासे झाले आहे. याबाबत लोकांच्या मनातील शंकांचे निरसन समर्पकरितीने होणे गरजेचे आहे.

# सतत पॅरोल कशासाठी?

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी शुक्रवारी हरियाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. तसं बघितलं तर, पुढील चार महिन्यांत तीन राज्यांतील विधानसभांचा कार्यकाळ संपत आहे. यात महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंडचा समावेश आहे. मागील १५ वर्षांपासून महाराष्ट्र आणि हरियाणाची निवडणूक सोबत होत आहे. दोन्ही राज्यांतील विधानसभांचा कार्यकाळ अवघ्या २३ दिवसांच्या फरकाने संपतो. यानंतरही महाराष्ट्राची निवडणूक जाहीर केली गेली नाही. निवडणुका कधी जाहीर करायच्या हा अधिकार निवडणूक आयोगाचा आहे.

मात्र, केंद्र सरकार 'एक देश एक निवडणूक'च्या दिशेने वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना याचा पुनरूच्चार केला. यानंतरही एकाच महिन्यात कार्यकाळ संपणार्या दोन राज्यांपैकी आयोगाने फक्त हरियाणाची निवडणूक जाहीर केली. याबाबत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डेरा सच्चा सौदाचे प्रमुख बाबा गुरमीत राम रहिम पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. २०१७ च्या सप्टेंबर महिन्यात बाबा राम रहिमला दोन मुलींवर बलात्कार करणे आणि एका पत्रकाराच्या खुनाच्या आरोपाखाली न्यायालयाने आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली होती. दोन वेगवेगळ्या प्रकरणात त्यास २०-२० वर्षांचा तुरूंगवास भोगायचा आहे. २०१७ पासून तो हरियाणाच्या सुनारिया तुरुंगात शिक्षा भोगत आहे.

निवडणुकीच्या या वातावरणात राम रहिमचा उल्लेख करण्यामागे खास कारण आहे. पश्चिम बंगालमध्ये एका महिला डॉक्टरांवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला. या घटनेमुळे अख्खा देश ढवळून निघाला आहे. देशभरातील डॉक्टर, सामाजिक संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून दोषीला त्याच्या कुकर्माची शिक्षा द्यावी अशी मागणी अख्खा देश करीत आहे. अशात दोन मुलींवर बलात्कार करण्याच्या आरोपाखाली आजीवन कारावासाची शिक्षा भोगत असलेल्या राम रहिम नावाच्या बाबाला २१ दिवसांची फर्लो मंजूर करण्यात आली आहे. यात कहर म्हणजे, ऑक्टोबर २०२० ते ऑगस्ट २०२४ या चार वर्षांच्या काळात (चौथे वर्ष संपायला आणखी अडीच महिने बाकी आहेत) त्याला १३ वेळी सुट्टी मंजूर करण्यात आली.

१) २० ऑक्टोबर २०२०- आईला भेटण्यासाठी एक दिवसाची पॅरोल २) १२ मे २०२१- बीपी चेक करण्यासाठी एक दिवसाची पॅरोल ३) १७ मे २०२१- आईला भेटण्यासाठी पुन्हा एकदा एक दिवसाची फर्लो ४) ३ जून २०२१- पोटात दुखतंय म्हणून सात दिवसांची पॅरोल ५) १३ जुलै २०२१- एम्समध्ये दाखविण्यासाठी पॅरोल ६) ७ फेब्रुवारी २०२२- २१ दिवसांची फर्लो ७) १७ जून २०२२- ३० दिवसांची पॅरोल ८) ऑक्टोबर २०२२- ४० दिवसांची पॅरोल ९) २१ जानेवारी २०२३- पुन्हा ४० दिवसांची पॅरोल १०) २० जुलै २०२३- ३० दिवसांची पॅरोल ११) २० नोव्हेंबर २०२३- २१ दिवसांची पॅरोल १२) १९ जानेवारी २०२४- पूर्ण ५० दिवसांची पॅरोल १३) १३ ऑगस्ट २०२४- २१ दिवसांची फर्लो. म्हणजे आरोपी राम रहिम चार वर्षांच्या कालावधीत २७४ दिवस सुट्टीचा आनंद उपभोगत होता.



७८व्या स्वातंत्र्यदिनी जेल प्रशासनाने राम रहिमला २१ दिवसांसाठी मोकळे केले. १५ ऑगस्ट हा त्याचा जन्मदिवस. याच दिवशी तो तुरुंगातून बाहेर पडला आणि बागपत येथील आश्रमात पोहोचला. याच वर्षी फेब्रुवारी महिन्यात राम रहीम ५० दिवसांच्या पॅरोलवर बाहेर आला होता. आता अवघ्या सहा महिन्यांनंतर त्याला पुन्हा एकदा २१ दिवसांसाठी तुरुंगातून सुट्टी देण्यात आली आहे. तुरूंग प्रशासन आणि राज्य सरकार दर चार महिन्यांच्या अंतरावर राम रहीमला सुट्ट्यांची भेट देते. खरं सांगायचं म्हणजे, बाबा गुरमीत राम रहिमचा उत्तर भारतात खूप प्रभाव आहे. लक्षावधी अनुयायी आहेत. प्रामुख्याने पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांत बाबांचे भक्त आहेत. ही भक्त मंडळी बाबा बोट दाखवतील त्याला मतदान करतात. अर्थात, बाबा कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही उमेदवाराचे राजकीय भविष्य बनवू शकतात किंवा बिघडवू शकतात.

राजकीय पक्ष याचा फायदा उचलण्यासाठी राम रहिमच्या इशार्यावर नाचतात. राम रहिमला वारंवार पॅरोल मिळण्यामागचं हेच सर्वात मोठं आणि महत्त्वाचं कारण आहे. राम रहिम निवडणुकीत किती उपयोगाचा आहे? हे जर जाणून घ्यायचं असेल तर त्याला आतापर्यंत मिळालेल्या पॅरोल आणि फर्लोचा काळ बघावा लागेल. २०२२ पासून आतापर्यंत राम रहिमला जेव्हा जेव्हा तुरुंगातून सुटी मिळाली तेव्हा तेव्हा निवडणुका असल्याचे दिसून येते.

जून २०२२ मध्ये जेव्हा बाबाला ३० दिवसांचा पॅरोल मिळाला होता तेव्हा हरियाणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत्या. ऑक्टोबर २०२२ मध्ये ४० दिवसांचा पॅरोल मिळाला तेव्हा आदमपूर मतदारसंघाची पोटनिवडणूक होती. फेब्रुवारी २०२२ मध्ये त्याला २१ दिवसांचा पॅरोल मिळाला, त्यानंतर काही दिवसांनी पंजाबमध्ये विधानसभा निवडणुका होत्या. २० जुलै २०२३ रोजी जेव्हा ३० दिवसांचा पॅरोल मिळाला तेव्हा हरियाणात पंचायत निवडणुका होणार होत्या. २१ नोव्हेंबर २०२३ रोजी २१ दिवसांचा पॅरोल मिळाला तेव्हा राजस्थानमध्ये विधानसभा निवडणुका होणार होत्या.

लोकसभा निवडणुकीपूर्वीही बाबाला ५० दिवसांचा पॅरोल मिळाला होता. आताही हरियाणा निवडणुकीपूर्वी २१ दिवसांसाठी फर्लो देण्यात आला आहे. तुरुंगात लक्षावधी कैदी असे आहेत जे एक दिवसाची सुट्टी मिळण्यासाठी आयुष्यभर वाट बघत असतात; पण पॅरोल मिळत नाही.अशात, शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने यावर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्यामते वर्षानुवर्षे तुरुंगात असलेल्या शिखांना पॅरोल मिळत नाही; पण बलात्कारी आणि खुनाचा आरोपी याला वारंवार सुट्टी दिली जाते.

पंजाब आणि हरियाणा हायकोर्टाने या प्रकरणी राज्य सरकारला राम रहिमला पॅरोल देण्यापूर्वी उच्च न्यायालयाचा सल्ला घ्यावा, असे निर्देश दिले होते. कैद्यांना पॅरोल मंजूर करणे हा राज्य सरकारांचा विषय आहे. एखाद्या कैद्याला त्याच्या चांगल्या वागणुकीमुळे सुविधा दिल्यास कोणाचाही आक्षेप नसावा.

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्याला फर्लो मिळाली आहे. ९० जागांच्या विधानसभेसाठी १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. निकाल ४ ऑक्टोबर रोजी लागणार आहे. मागील १० वर्षांपासून हरियाणात भाजपचे सरकार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला जबरदस्त फटका बसला होता. आता हरियाणाच्या निवडणुकीत बाबा राम रहिमच्या सुट्टीचा कितपत फायदा होतो? यासाठी ४ ऑक्टोबरची प्रतीक्षा करावी लागेल.

# श्रावणी सोमवाराला बनवून पहा चवदार गूळ मखाणे, फक्त ५ मिनिटांतच तयार होईल रेसिपी

श्रावण महिना अखेर सुरु झाला आहे. हिंदू धर्मात हा महिना एक पवित्र महिना म्हणून ओळखला जातो. व्रत–वैकल्याचा महिना म्हणूनही याची ओळख आहे. हा महिना संपूर्णपणे भगवान शंकराला समर्पित असून अनेकजण या महिन्यात उपवास करत असतात. आता उपवास म्हटलं की, अनेक गोष्टी खाणे या वर्ज्य असते. त्यामुळे आपल्याला कितीही भूक लागली तरी आपण फक्त काही निवडक पदार्थांचाच आस्वाद घेऊ शकतो. तुम्हीही या श्रावणात उपवास केला असेल आणि स्नॅक्ससाठीचा एक चविष्ट पदार्थ शोधत असाल तर आजची ही रेसिपी तुमच्यासाठी फायद्याची ठरणार आहे. आज आम्ही तुम्हाला गूळ मखाण्यांची रेसिपी सांगत आहोत. ही रेसिपी चवीला फार अप्रतिम लागते आणि संध्याकाळच्या नाश्त्यात तुम्ही याचा समावेश करू शकता. मुख्य म्हणजे या रेसिपीला बनवायला ना जास्त सामग्री आणि जास्त वेळ लागतो. त्यामुळे घाईघाडबडीच्या वेळेस तर ही रेसिपी तुमच्यासाठी एक परफेक्ट पर्याय आहे. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.





साहित्य २ कप मखाना ३ चमचे गूळ पावडर ४ चमचे तूप

कृती गूळ मखाणे बनवण्यासाठी सर्वप्रथम गॅसवर एक पॅन ठेवा आता या पॅनमध्ये तूप टाका यानंतर यात मखाणे टाका आणि मंद आचेवर यांना छान परतून घ्या मखाण्यांना सोनेरी रंग येईपर्यंत छान परता आणि मग गॅस बंद करा यानंतर गॅसवर एक दुसरा पॅन ठेवा आणि यात तूप टाका तूप गरम झाले ई यात दोन चमचे गुळ पावडर टाका आणि मिक्स करा

यानंतर पॅनमध्ये गुळाचा पाक तयार झाला की त्यात परतून घेतलेले मखाणे टाका आणि व्यवस्थित मिक्स करून घ्या ४–५ मिनिटे छान परतल्यानंतर गॅस बंद करा अशाप्रकारे तुमचे गूळ मखाणे तयार होतील एका प्लेटमध्ये यांना गरमा गरम खाण्यासाठी सर्व्ह करा

# १० मिनिटांमध्ये लहान मुलांच्या नाश्त्यासाठी बनवा हेल्दी टेस्टी चपाती मोमो, वाचा रेसिपी

जेवणाच्या डब्यात किंवा इतर वेळी नाश्त्यासाठी लहान मुलांना नेमकं काय खायला द्यावं असा प्रश्न सर्वच पालकांना पडतो. लहान मुलं नाश्ता करताना मला हे नको मला ते नको असच करतात. अशावेळी मुलांना नेमकं काय बनवून द्यावं हे समजत नाही. अनेकदा मुलं डब्यामध्ये दिलेली चपाती पुन्हा परत घरी घेऊन येतात.दिलेला डब्बा कधीच पूर्णपणे संपवत नाही. त्यामुळे लहान मुलांच्या डब्यात किंवा नाश्त्यासाठी घरी बनवलेल्या चपातीपासून मोमोज नक्की बनवून द्या.चपातीपासून बनवलेले मोमोज मुलांना नक्कीच आवडतील. कमीत कमी साहित्यामध्ये झटपट तयार होणारे मोमोज खाऊन लहान मुलांसह घरातील मोठे व्यक्तीसुद्धा मोमोज आवडीने खातील. चला तर जाणून घेऊया मोमोज बनवायची रेसिपी. साहित्य: कोबी गाजर कांदा आलं लसूणपेस्ट मीठ पनीर काळीमिरी पावडर रेड चिली सॉस सोया सॉस चपाती शेजवान सॉस टोमॅटो सॉस ओरेगॅनो हर्ब्स कृती: चपातीपासून मोमोज बनवण्यासाठी सर्वप्रथम कढईमध्ये तेल गरम करून त्यात बारीक चिरलेला कोबी, गाजर, फरसबी, पनीरचे टाकून तेलात व्यवस्थित भाजून






घ्या. त्यानंतर भाज्यांना एक वाफ आल्यानंतर त्यात काळीमिरी पूड, चवीनुसार मीठ, रेड चिली सॉस, सोया सॉस, टोमॅटो सॉस घालून मिश्रण एकत्र करून घ्या. मोमोजच्या आतील मिश्रण अशाप्रकारे बनवा.गव्हाचे पीठ मळून घ्यावे्याछोट्या छोट्या चपात्या बनवून घ्या. त्यानंतर त्यात तयार केलेले कणिकाचे पीठ भरून मोमोज चारही बाजूने बंद करा.मोमोज वाफवण्यासाठी चाळणीला तेल लावून त्यात मोमोज ठेवून १५ मिनिटं एक वाफ काढून व्यवस्थित शिजवून घ्या. मोमोज शिजल्यानंतर बाहेर काढून थोडे थंड झाल्यानंतर वरून ओरेगॅनो आणि चिली फ्लेस्क टाकून सर्व्ह करा.

# अंबानींच्या घरात नाश्त्याला बनतो हा ६० रुपयांचा पदार्थ, फायदे वाचून तुम्हीही कराल आहारात समावेश

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत मुकेश अंबानींच्या कुटुंबाचा आवर्जून समावेश येतो. अंबानींच्या प्रत्येक कार्यक्रमात त्यांच्या संपत्तीचा देखावा हा होतोच. अंबानींची वार्षिक सरासरी ८००० कोटींहून अधिक आहे. जगातील १० श्रीमंत व्यक्तींच्या यादीत त्यांचे नाव येते. अशात अनेकदा इतका श्रीमंत व्यक्ती नक्की काय खात असावा असा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. उद्योगपती मुकेश अंबानी हे त्यांच्या साधेपणासाठी ओळखले जातात. आशियातील सर्वात श्रीमंत उद्योगपतींमध्ये गणले जात असले तरी त्यांची जीवनशैली आणि जेवण अगदी साधे आहे.

मुकेश आणि त्यांची पत्नी नीता अंबानी खाण्यापिण्याचे फार शौकीन आहेत. मोठमोठ्या ५ स्टार हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सच्या प्रसिद्ध पदार्थ आणि पाककृतींऐवजी, नीता आणि मुकेश अंबानी यांना अगदी साधे स्ट्रीट फूड आणि घरी बनवलेले अन्न खायला आवडते. अशातच नाश्ताबद्दल बोलणे केले तर, मुकेश अंबानी यांना इडली सांबार खायला फार आवडते. यातही त्यांना ‘कॅफे मैसूर’ या जागी मिळणार इडली सांबार अधिक आवडतो. इडली सांबार अनेक भारतीयांचा एक आवडता आणि सोलफूल नाश्ता आहे.





फक्त चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही हा नाश्ता फायद्याचा ठरत असतो. चला तर मग याचे फायदे जाणून घेऊयात.

वजन कमी होते इडली आणि सांबार हे दोन्ही कमी कॅलरी असलेले पदार्थ आहेत. यामध्ये कॅलरीजचे प्रमाण फार कमी असते. याशिवाय, हे देखील उच्च फायबरयुक्त पदार्थ आहेत. फायबर आपल्या पचनासाठी फार चांगले मानले जाते. जर तुम्ही रोज इडली किंवा सांबार खाल्ल्यास पोट अधिक काळ भरलेले राहते आणि याने सारखी भूकही लागत नाही. अशा प्रकारे तुम्ही कमी कॅलरीज खाता आणि यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहते. सकाळच्या नाश्त्यात तुम्ही नक्कीच या पदार्थाचा समावेश करू शकता.

पचन सुधारते इडली आणि सांबारमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. आपल्या आहारात फायबरचे असणे फार गरजेचे असते. फायबर पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. जेव्हा आपण दररोज इडली आणि सांबार दीर्घकाळ खातो तेव्हा त्यातील फायबर आपल्याला बद्धकोष्ठता, पेटके, पोटदुखी इत्यादी पाचन समस्यांपासून आराम देईल.

# चपाती की भात? वजन कमी करण्यासाठी काय आहे फायदेशीर, जाणून घ्या सविस्तर

जगभरात सगळीकडे मधुमेह आणि लठ्ठपणाच्या समस्येने त्रस्त झालेले अनेक लोक आहेत. लठ्ठपणा वाढल्यानंतर आरोग्यसंबंधित अनेक समस्या उद्भवतात. दिवसभर सतत एका जागेवर खुर्चीत बसून किंवा इतर काही कारणांमुळे आरोग्य बिघडते. एका जागेवर बसून सतत काम केल्यामुळे लठ्ठपणा वाढतो. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. सतत जीममध्ये जाऊन व्यायाम करणे, आहारतज्ज्ञांकडून घेतलेला डाईट फॉलो करणे इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. तसेच आहार फॉलो करताना वजन कमी करण्यासाठी आणि मधुमेहाच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी नेमकी चपाती चांगली की भात? असा प्रश्न अनेकदा पडतो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला वजन कमी करण्यासाठी नेमकं काय खावं, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

भारतीय जेवणात दुपारी आणि संध्याकाळच्या जेवणात चपाती आणि भात प्रामुख्याने खालला जातो. चपाती भात खाल्ल्याशिवाय जेवण जेवल्यासारखे वाटत नाही. तसेच भात आणि चपातीमध्ये मुबलक प्रमाणात खनिजे आढळून येतात. चपाती आणि भातामध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण जास्त असते, तर चपातीमध्ये प्रथिनांपेक्षा जास्त फायबर असतात. त्यामुळे दोन्ही पदार्थांमध्ये सम प्रमाणात फायबर आणि प्रथिने आढळून येतात. तांदळामध्ये फायबरचे प्रमाण कमी असल्यामुळे भात खाल्ल्यानंतर काही वेळाने लगेच भूक लागते. तर चपाती खाल्ल्यानतंर पोट भरलेले राहते. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी रोजच्या आहारात चपातीचा समावेश करावा. वजन कमी करण्यासाठी





भातापेक्षा चपाती फायदेशीर: जेवणामध्ये भात खाल्ल्यानंतर काही वेळाने लगेच भूक लागते. पण चपाती खाल्ल्यानंतर जास्त वेळ पोट भरलेले राहून लवकर भूक लागत नाही. वजन कमी करण्यासाठी आणि मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी आहारात भाताऐवजी चपातीचा समावेश करावा. चपाती खाल्ल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते.

तांदळामध्ये असलेले साधे कार्ब सहज पचतात. त्यानंतर ते रक्तप्रवाहामध्ये ग्लुकोज सोडतात. यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू लागते. पण चपातीमध्ये कमी–ग्लायसेमिक इंडेक्स कार्बोहायड्रेट आढळून येतात, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते.

चपातीमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम इत्यादी अनेक घटक आढळून येतात. यामुळे वाढलेले वजन कमी होण्यासोबतच रक्तातील साखर नियंत्रणात राहते.

# जागतिक मच्छर दिवस २०२४; डासांमुळे होणाऱ्या धोक्यांच्या जनजागृतीसाठी एक महत्त्वाचा दिवस

दरवर्षी २० ऑगस्ट हा दिवस जगभरात ‘जागतिक मच्छर दिवस’ म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट डासांमुळे होणाऱ्या रोगांबाबत जनजागृती करणे आणि त्यावर उपाययोजना करण्यावर भर देणे आहे. लहान दिसणारे डास डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारखे अनेक आजार पसरवू शकतात आणि उपचारात उशीर किंवा निष्काळजीपणामुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. जागतिक स्तरावर हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना या धोक्यांची जाणीव करून देणे आणि डासांपासून बचाव करण्यासाठीच्या उपाययोजना सांगणे हा आहे.

जागतिक मच्छर दिवसची सुरुवात कशी झाली? हा दिवस पहिल्यांदा १८९७ मध्ये डॉ. रोनाल्ड रॉस यांनी शोधलेल्या मलेरिया प्रसाराच्या शोधाचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाऊ लागला. रॉस यांनी केलेल्या संशोधनात असे आढळून आले की, मादी एनाफोलीज डासांपासून मलेरिया पसरतो. त्यांच्या या शोधासाठी त्यांना वैद्यकशास्त्राचे नोबेल पारितोषिकही देण्यात आले. त्यांच्या या महत्त्वपूर्ण शोधानंतर, मलेरिया नियंत्रणाच्या उपाययोजनांसाठी मोठी प्रगती होऊ लागली. त्यांनंतर रोनाल्ड रॉस यांना समर्पित म्हणून हा दिवस साजरा करण्याची सुरुवात लंडन स्कूल ऑफ हायजीन अँड ट्रॉपिकल मेडिसिनने १९३० साली केली होती.



जागतिक मच्छर दिवसाचे महत्त्व डास हा जगातील सर्वात धोकादायक कीटकांपैकी एक मानला जातो. त्यांच्या चावण्यामुळे डेंग्यू, चिकुनगुनिया, झिका विषाणू आणि मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. योग्य काळजी घेतली गेली नाही तर हे आजार जीवघेणेही ठरू शकतात. डासांमुळे होणा–या आजारांमुळे जगात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. मिळालेल्या माहितीनसार एक अहवाल समोर आला आहे. या अहवालात सांगण्यात आले आहे की, २०१० साली आफ्रिकेत सर्वाधिक मृत्यू हे डासांच्या चावण्यामुळे झाले होते. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना या धोकादायक आजारांबद्दल जागरूक करणे आणि डासांपासून स्वतःचे संरक्षण करण्याचे मार्ग सांगणे हा आहे.

डासांमुळे होणा–या धोक्यांसह, हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे की हे धोकादायक कीटक आपल्या परिसंस्थेच्या सुरळीत चालण्यामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांना पूर्णपणे काढून टाकल्याने पर्यावरणीय संतुलन बिघडू शकते, ज्यामुळे अनेक प्रकारचे धोके निर्माण होऊ शकतात. म्हणून, त्यांना नष्ट करण्याऐवजी, शास्त्रज्ञ त्यांच्या पुनरुत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्यामुळे होणारे रोग टाळण्यासाठी उपायांवर लक्ष केंद्रित करण्याची शिफारस करतात. जागतिक मच्छर दिवस २०२४ थीम यंदाच्या २०२४ मध्ये डासांपासून संरक्षण आणि जागरूकता या उद्देशावर भर दिला जात आहे. सरकारी आरोग्य संस्था स्वयंसेवी संस्था आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना विविध कार्यक्रमांद्वारे डास प्रतिबंधक उपाय आणि डासांपासून होणाऱ्या रोगांचे व्यवस्थापन यावर चर्चा करत आहेत.

# पावसाळ्यात नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या रत्नागिरीतील ‘या’ सुंदर ठिकाणांना जरूर भेट द्या


नुकताच पावसाळा ऋतू सुरु झाला आहे. या ऋतूत अनेक ठिकाणांचे सौंदर्य आणखीनच बहरून येते. पावसाळ्यात अनेकजण फिरायला जाण्याचा विचार करत असतात. फिरण्यासाठी हा एक परफेक्ट ऋतू मानला जातो. या पावसाळ्यात जर तुम्हीही कुठे फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर रत्नागिरी तुमच्यासाठी एक उत्तम स्पॉट ठरु शकतो. निसर्गमय वातावरण, शांतता आणि ऐतिहासिक वस्तूंनी युक्त रत्नागिरी तुमच्या विकेंडची मजा द्विगुणित करेल. आज आम्ही तुम्हाला रत्नागिरीतील काही फेमस आणि सुंदर ठिकाणांविषयी माहिती सांगत आहोत. रत्नागिरीला जाण्याचा विचार करत असाल तर हे स्पॉट्स तुमच्या लिस्टमध्ये असायलाच हवेत. रत्नागिरीच्या या ठिकाणांचा अनुभव घ्या पावसाळ्यात तुम्ही तुमच्या कुटुंबासह रत्नागिरीतील काही फेमस ठिकाणांना भेट देऊ शकता. रत्नागिरी हा महाराष्ट्रातील एक सुंदर जिल्हा आहे, जिथे समुद्रकिनारे, नैसर्गिक सौंदर्य आणि ऐतिहासिक ठिकाणे तुम्हाला आकर्षित करतील. चला जाणून घेऊया रत्नागिरीतील काही उत्तम ठिकाणांबद्दल. रत्नागिरीची तीर्थ गंगा जर तुम्ही रत्नागिरीला जाण्याचा विचार करत असाल, तर रत्नागिरीपासून हाकेच्या अंतरावर असलेली तीर्थ गंगा ही एक पवित्र नदी आहे, जिथे तुम्ही तुमच्या कुटुंबासह नदीच्या काठावर बसून सुंदर नैसर्गिक दृश्याचा आनंद घेऊ शकता. एवढेच नाही तर या नदीत तुम्ही स्नानही करू शकता. रत्नागिरीचा गणपतीपुळे याशिवाय तुम्ही महाड शहरात फिरायला जाऊ शकता. हे रत्नागिरीपासून काही किलोमीटर अंतरावर आहे. येथे तुम्ही साईबाबांच्या मंदिरालाही भेट देऊ शकता.

# आहाराशिवाय अचानक वजन कमी झाले आहे? मग असू शकतात ‘या’ आजारांची गंभीर लक्षणे

धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकदा आरोग्यासंबंधित अनेक गंभीर समस्या उद्भवण्याची शक्यता असते. या समस्या उद्भवल्यानंतर हळूहळू त्यांची लक्षणे दिसू लागतात. आरोग्यसंबंधित छोटीमोठी लक्षणे दिसू लागल्यानंतर आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यानंतर पूढे जाऊन त्याचे गंभीर आजारांमध्ये रूपांतर होते. अनेकदा आहार किंवा व्यायाम न करतात वजन कमी होण्यास सुरुवात होते, सतत धाप लागणे, वारंवार ताप किंवा सर्दी होणे, सतत खोकला लागणे इत्यादी समस्या जाणवू लागल्यानंतर दुर्लक्ष केले जाते. पण या आजारांकडे दुर्लक्ष केल्यामुळे पुढे जाऊन हेच आजार मोठे होतात.अचानक वजन कमी होणे: अनेक लोक वाढलेले वजन कमी करण्यासाठी खूप प्रयत्न करतात, पण काहींचे वजन कोणत्याही गोष्टी न करता कमी होण्यास सुरुवात होते. सतत वजन कमी झाल्यामुळे मधुमेह, थायरॉईड डिसऑर्डर किंवा कर्करोग यांसारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. स्ट्रेस डिसऑर्डर, एनोरेक्सिया, बुलिमिया इत्यादी आजार होऊ शकतात. वजन कमी होण्याची लक्षणे जाणवू लागल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार घेऊन आरोग्याची काळजी घ्यावी.

श्वास घेण्यास त्रास होणे: काम करताना अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्यानंतर मनात अनेक शंका निर्माण होतात. दम्याचा त्रास असलेल्या लोकांना श्वास घेण्यास त्रास होतो. अशा व्यक्तींनी जास्त काम किंवा उंच डोंगर असलेल्या ठिकाणी जाऊ नये. त्यामुळे श्वासासंबंधित समस्या उद्भवू लागतात. श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्यानंतर हृदयविकाराचा झटका किंवा हार्ट फेल्युअर, व्हॉल्व्ह डिसऑर्डर कधीकधी कार्डियाक अस्थमासारख्या आजारांचा धोका वाढतो.

वारंवार आजारी पडणे: खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये बदल झाल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवतता. काहींना सतत ताप किंवा सर्दी होते. आजारी पडल्यानंतर आजार लवकर



बरा न होणे, अशक्तपणा इत्यादी अनेक समस्या जाणवतात.शरीरामध्ये पोषक घटकांची कमतरता किंवा आरोग्यसंबंधित गंभीर समस्या उद्भवल्यानंतरच व्यक्ती वारंवार आजारी पडू लागतो.

निद्रानाश: शरीरामध्ये पोषक घटकांची कमतरता निर्माण झाल्यानंतर रात्रीच्या वेळी किंवा इतर वेळी नीट झोप लागत नाही. झोप पूर्ण न झाल्यानंतर आरोग्य बिघडून जाते. अपचन, ऍसिडिटी इत्यादी समस्या जाणवतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करून आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

# दोन वर्षापासून आहे प्रशासकराज दिवाळीनंतर विधानसभा, मिनी मंत्रालयाचे काय?

शेतकऱ्यांवर चिंबडीचे संकट
जुलै महिन्यात झालेल्या २२ दिवसांच्या पावसाने व ऑगस्ट महिन्यात सुरुवातीस पावसाची रिपरिप यामुळे पाणथळ जमिनीतील व सखल भागातील जमिनीवरील पिके पिंगट, पिवळी पडून चिबडली आहे. पंचनामे करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. मागील वर्षापासून शेतकरी नैसर्गिक संकटाचा सामना करत आहे.

किनवट/शेख शौकत :–लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्ष मोर्चे बांधणीला लागले आहेत. तर दुसरीकडे गाव–खेड्यांच्या विकासाची गंगा संबोधल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका केव्हा होणार, असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. दिवाळीनंतर विधानसभा निवडणूक होणार आहे. परंतु मिनी मंत्रालयाचा मुहूर्त कधी ठरणार, याकडे लक्ष लागले आहे. विधानसभेची निवडणूक होईल, पण जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका मात्र दोन वर्षांचा कालावधी लोटत असतानाही घोषित करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे दोन वर्षांपासून लोकप्रतिनिधींच्या हक्कावर गदा आली असून प्रशासक राज वरच 'भागवले जात आहे. प्रशासक राजमुळे कोणाचाही कोणावर अंकुश नसल्याचे दिसून येत आहे. तर मिनी मंत्रालयात जाण्याचे इच्छुकांचे स्वप्न स्वप्नच राहिले आहे. जुलै२०२२मध्येजिल्हापरिषदेच्यागटवपंचायतसमितीच्या आरक्षण सोडत झाली. त्यानंतर मिनी मंत्रालय निवडणुकीचे वारे जोरात वाहायला सुरुवात झाली. बहुतांश गट हे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने निवडणुकीसाठी बाशिंग बांधून असलेला जो–तो आता आपण मिनी मंत्रालयात जाणार या तोऱ्यात होता. मात्र महाविकास आघाडी सरकार कोसळले आणि शिंदे सरकार सत्तेत आले. या सरकारने २०१७ नुसारच निवडणुका होतील असे घोषित केले. नव्या गट व गण रचनेला स्थगिती दिली. त्यामुळे निवडणूक लढवण्यासाठी उतावीळ झालेल्या इच्छुकांच्या आशेवर पाणी फेरले. असे काही इच्छुक आहेत की ते केवळ बॅनर होल्डिंग लावून प्रसिद्धीच्या झोतात आहेत. मात्र त्या इच्छुकांच्या व पाठिंबा देणाऱ्यांच्या गावांत लोकसभा निवडणुकीत पाहिजे तसे मतदान उमेदवाराला झाले नाही. त्यांचा अपेक्षाभंग झाला आहे. महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो जिल्हा परिषद व पंचायत समितीचे भावी उमेदवार असे घोषित केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत याचा फटका महाविकास आघाडी व महायुतीच्या उमेदवारांना बसणार आहे.

# कमला हॅरिस यांच्या जनाधारात होतेय वाढ



वॉशिंग्टन, वृत्तसंस्था : डेमोक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्या लोकप्रियतेमध्ये वाढ होत असल्याचे सर्वेक्षणातून पुढे आले आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यापेक्षा कमला यांना रेटिंगमध्ये पसंती मिळत असल्याचे चित्र आहे. अमेरिकेतील ४८ टक्के नागरिकांनी हॅरिस यांच्या बाजूने

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी वार्धक्यामुळे राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर उपाध्यक्ष कमला यांच्या उमेदवारीवर डेमोक्रॅटिक पक्षाने शिक्कामोर्तब केले. यानंतर भारतीय वंशाच्या कमला यांनी प्रचाराचा धडाकाच लावला आहे. नोव्हेंबर महिन्यात अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदासाठी निवडणूक होत आहे. अमेरिकेतील वृत्तवाहिन्यांनी केलेल्या सर्वेक्षणामध्ये कमला हॅरिस यांच्या रेटिंगमध्ये वाढ होत आहे. असोसिएटेड प्रेस आणि एनओआरसी या पब्लिक अफेअर्स रिसर्च सेंटरद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये अमेरिकेतील ४८ टक्के नागरिकांनी हॅरिस यांच्या बाजूने कल दर्शविला आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून आतापर्यंत ४०१ जणांची निवड

लातूर : – राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून जिल्ह्यात आतापर्यंत २ हजार १३३ पदे अधिसूचित झाली आहेत. यापैकी ४०१ जणांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच पदे अधिसूचित करण्याची व निवडीची प्रक्रिया सुरू आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय तथा निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी इयत्ता बारावी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार रुपये, आयटीआय, पदविकाधारक प्रशिक्षणार्थींना ८ हजार रुपये आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय आस्थापना, उद्योग, महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के किंवा किमान एक उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, आणि विविध आस्थापना यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावी. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विभागामार्फत विद्यावेतन दिले जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी वरील वेबपोर्टलला भेट देवून योजनेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता विकास केंद्राचे सहाय्यक संचालक बालाजी मरे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभातून बँकांनी कोणतेही कर्ज समायोजन न करण्याच्या सूचना

लातूर :– राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभाची रक्कम महिलांच्या बँक खात्यात जमा झाली आहे. या रक्कमेतून बँकांनी कोणत्याही कर्जाचे समायोजन करू नये, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक प्रमोद शिंदे, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक बालाजी मरे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून हस्तांतरित केलेली रक्कम कोणत्याही थकीत कर्जाच्या बदल्यात समायोजित न करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व बँकांनी कार्यवाही करावी. तसेच काही लाभार्थ्याकडे बँकेचे प्रलंबित असलेल्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे बँक खाते गोठविण्यात आले असल्यास हे बँक खाते तत्काळ सुरु करण्यात यावे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्राप्त होणारी लाभाची रक्कम लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्यावतीने राखी पोर्णिमा निमित्त वृक्षसंगोपनाचा संकल्प अभिनव उपक्रम : विद्यार्थ्यांना मिळाली वृक्ष संगोपनाची नवी दिशा



लातूर दि.२०–०८–२०२४ जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच सामाजिक उपक्रमाची जोड देणारे शिक्षणही देण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून केले जाते. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून राखी पोर्णिमेनिमित्त वृक्ष लागवडीबरोबरच वृक्षसंगोपनाचा संकल्प करून वृक्ष लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचे काम स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्यावतीने केले जात आहे. विद्यालयाने सुरू केलेला हा उपक्रम इतर विद्यालय व संस्थासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्यावतीने वर्षभर येणारे सण, उत्सव विधायकतेची जोड देऊन साजरे केले जातात. त्या उपक्रमाचाच एक भाग म्हणून रक्षाबंधनानिमित्त वृक्षाला राखी बांधून त्या वृक्षाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी एकमताने स्वीकारली. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने राखी तयार करून प्राथमिक विद्यालयाच्या परिसरातील अनेक झाडांना बांधून वृक्ष लागवडीबरोबरच संवर्धन व सरंक्षणाचा संकल्पही या माध्यमातून करण्यात आला.

यावेळी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक तुकाराम येलाले, अकॅडमीक कोऑर्डिनेटर वर्षा वेधे यांच्यासह सांस्कृतिक विभाग प्रमुख व शिक्षक यांनी परिश्रम घेतले. स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाने राखी पोर्णिमा या सणाबरोबरच राखी पोर्णिमेतून वृक्षलागवड व वृक्ष संवर्धन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून समोर आलेला आहे. त्यामुळे हा सामाजिक उपक्रम इतर संस्था व शाळेसाठी दिशादर्शक ठरणारा आहे.

# महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना प्रोत्साहनपर लाभासाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करण्याचे आवाहन

लातूर : – महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेमध्ये पात्र ठरलेल्या परंतू आधार प्रमाणिकरण न झालेल्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करुन घेण्यासाठी महा–आयटी यांनी १२ ऑगस्ट, २०२४ ते ७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणासाठी टॅब उपलब्ध करुन दिला आहे. तसेच या संबंधित राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकानीदेखील लाभार्थी शेतकऱ्यांना व्यक्तीश: कळविण्याबाबत संबंधित बँकांना सूचित करण्यात आले आहे. जे शेतकरी या योजनेतंर्गत लाभासाठी पात्र ठरले आहेत व ज्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आलेला आहे. तथापि ज्यांचे आधार प्रमाणिकरण झालेले नाही, अशा शेतकऱ्यांनी संबंधित बँक शाखांशी संपर्क साधून व आधार प्रमाणिकरण तात्काळ करुन घ्यावे, असे आवाहन सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे.

# दाभोळकरांचा वारसा पूढे चालवू प्रकाश घादगीने अंनिसचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

लातूर–अंनिसचे संस्थापक डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा वारसा आपण समर्थपणे पुढे चालवू. समाजातील अनिष्ट चालीरीतींना पायबंद घालू, असे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य प्रकाश घादगीने यांनी व्यक्त केले.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट रोजी जिल्हा क्रिडा संकुलात डॉ. दाभोलकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पाचे राज्य प्रमुख वसंतराव टेकाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य मंडळाचे अध्यक्ष अॅड. एस.एन.बोडखे, प्राचार्य माधव गादेकर, कवि नरसिंग इंगळे, डॉ. काशीनाथ सलगर, सदाशिव पोटे, वसंतराव बेंडे, राजकुमार दाभाडे, किशोर जैन, राजीव नाईक, एन. व्ही. पाटील, प्रकाश निला, रमेश भोयरेकर, प्रताप मोरे आदींची उपस्थिती होती. यावेळी लातूरचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब गोडबोले, कार्याध्यक्ष पंकज जैस्वाल, प्रधान सचिव प्रा.एम.बी.पठाण यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.



यानंतर डॉ. नरेंद्र दाभोलकर लिखीत पुस्तकांचे वितरण करण्यात आले. अंनिसतर्फे यंदा पहिल्यांदाच छोटी आणि वाचकांसाठी सुलभ असणारी डॉ. दाभोलकर लिखित पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विशेषत: लहान लहान १५ पुस्तकाचा संच लोकप्रिय झाला आहे. या उपक्रमात युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन वसंतराव टेंकाळे यांनी केले.या कार्यक्रमानंतर अंनिसच्या शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षक डॉ. सोमय मुंडे यांची भेट घेऊन लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करण्याबाबत निवेदन दिले.

# केजरीवालांच्या न्यायालयीन कोठडीत २७ ऑगस्टपर्यंत वाढ

दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्यघतील सीबीआय प्रकरणी आज ( दि. २०) दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची न्यायालयीन कोठडी २७ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवली आहे.



दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने २६ जून रोजी तिहार तुरुंगातून अटक केली होती. ईडीने दाखल केलेल्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ते न्यायालयीन कोठडीत असताना ही कारवाई करण्यात आली . केंद्रीय अन्वेषण ब्युरो ने अबकारी धोरण प्रकरणात केजरीवाल आणि इतरांविरुद्ध दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टात आरोपपत्र दाखल केले आहे. सीबीआय आणि ईडीने आता अबकारी घोटाळ्याप्रकरणातील चौकशी पूर्ण केली आहे.

# धैर्यशील पाटील यांना भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी

मुंबई : भाजपाकडून राज्यसभेच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. भाजपाने रायगड जिल्ह्यातील धैर्यशील पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. गेल्या वर्षीच भाजपाने रायगडमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा मोहरा गळाला लावला होता. आता दुस–याच वर्षी पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



भाजपाने राज्यसभेसाठी ९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात आसामधून मिशनरंजन दास, रामेश्वर तेली. बिहारमधून मनन कुमार मिश्र, हरियाणामधून किरण चौधरी, मध्य प्रदेशमधून जॉर्ज कुरियन, महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील, ओडिसा येथून ममता मेहंता, राजस्थान मधून सरदार रवनीत सिंह बिट्टू, त्रिपुरा येथून राजीब भट्टाचार्जी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील रिक्त झालेल्या राज्यसभेच्या दोन जागांसाठी निवडणूक झाल्यानंतर या दोन जागांवर कोण लढणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती.

भाजपाचे नेते पीयूष गोयल आणि उदयनराजे भोसले यांची लोकसभेवर निवड झाल्याने या दोन जागा रिक्त झालेल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही जागांवर भाजपा आपले उमेदवार देणार की त्यापैकी एक जागा मित्रपक्षाला देणार, याबाबत चर्चा सुरू होत्या. दरम्यान, आता भाजपाने यादी जाहीर करत एकाच जागेवर उमेदवार जाहीर केला आहे. राज्यसभेसाठी भाजपाकडून अनेकांची नावांची चर्चा होती. पण, रायगडच्या धैर्यशील पाटलांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे.

# राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप उमेदवारांची यादी जाहीर



राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपने विविध राज्यांतील उमेदवारांची यादी आज (दि.२०) जाहीर केली आहे. या यादीत महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजप उमेदवारांची नावे – आसाममधून मिशन रंजन दास, रामेश्वर तेली, बिहारमधून मनन कुमार मिश्र, हरियाणामधून श्रीमती किरण चौधरी, मध्यप्रदेशातून जॉर्ज कुरियन, ओडिशातून ममता मोहंता, राजस्थानातून सरदार रवनीत सिंह बट्टू, त्रिपुरा राजीव भट्टाचार्य यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

# वकील कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्युटचे घवघवीत यश कु. साक्षी सुनिल वाघमारे कॉम्प्युटर टाईपिंग परीक्षेत प्रथम

लातूर: मुरुड येथील वकील कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्युटची विद्यार्थीनी कु. साक्षी सुनिल वाघमारे ही इंग्रजी ३० विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून संस्थेतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तसेच ती इंग्रजी ४० विषयात ९४ गुण व मराठी – ३० विषयात ९०.५ गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. याच संस्थेतील दुसरी विद्यार्थीनी कु. निकीता विष्णू जाडकर या विद्यार्थीनीने इंग्रजी–३० विषयात ९४ गुण, इंग्रजी ४० विषयात ८९.५ गुण, तर मराठी –३० या विषयात ९२ घेवून उत्तीर्ण झाली आहे. वकील कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिटयूटमध्ये ३२ विद्यार्थी अ ग्रेडमध्ये, १८ विद्यार्थी व ग्रेडमध्ये व २ विद्यार्थी क ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांसह उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून विद्यार्थ्यांच्या यशासाठी इन्स्टिट्युटचे प्राचार्य अखिल मनियार यांचे मार्गदर्शन लाभल्याचे उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती व संस्थेत विद्यार्थ्यांकडून करुन घेतलेला सराव यामुळे प्रत्येक वर्षी संस्थेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते. जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होण्याची परंपरा संस्थेने अबाधित ठेवली असल्याचे संस्थेचे प्राचार्य अखिल मनियार त्यांच्या मनोगतात मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल लातूर जिल्हा संगणक टंकलेखन संघटनेचे अध्यक्ष जे. के. वाघमारे, संस्थाचालक मिलिंद सोनकांबळे, बालाजी खरटमोल, दिलीप मुकडे, भैय्यासाहेब सोनवणे, चंद्रकांत सांगवीकर, श्रीमंत जाधव, गंगाधर सरोदे, परमेश्वर फुटाणे, कांचन कुलकर्णी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व अखिल मनियार यांचे अभिनंदन केले.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE